# ईशस्तवन

dt.11th April 2010

पापनाशासाठी सत्कर्मांना जोड आवश्यक ठरते ती स्तुतिपठणाची. स्तुती ही अहंकारशून्यतेशिवाय करता येत नाही आणि अहंकारासहित केलेली स्तुती ही खरी स्तुती असू शकत नाही.

शब्दांद्वारे केलेल्या गुणवर्णनाला स्तुती किंवा स्तवन म्हणतात. वैदिक काळात ऋषींना जाणवलेल्या शक्तींची स्तुती त्यांनी आर्ष संस्कृतात केली, ज्यांना सूक्त म्हणतात. श्रीसूक्त, लक्ष्मीसूक्त, रुद्रसूक्त अशी प्रत्येक देवतेची सूक्ते वेदामध्ये आहेत. सूक्त याचा शब्दश: अर्थ म्हणजे 'चांगल्या रीतीने सांगितलेले'. याच धर्तीवर अर्वाचीन काळातील स्तवन रचनांना स्तोत्र म्हटले गेले आहे. अद्वैत वेदांताचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण भारतखंडात करणाऱ्या श्रीमद् आद्य शंकराचार्यांनीदेखील ज्यात मुळात द्वैत अनुस्यूत असते अशा कृष्णाष्टकम्, पांडुरंगाष्टकम्, अन्नपूर्णास्तोत्र यासारखी उच्च काव्यगुणांनी परिपूर्ण असणारी अनेक स्तवने रचली.

आजच्या समाजाला स्तुती या शब्दाचा मर्यादित अर्थच ज्ञात असल्याने ऐंद्रिय ज्ञानाच्या कक्षेपलीकडे असलेल्या 'ईश्वर नामक तत्त्वाची स्तुती कशाकरिता करायची?' असा प्रश्न उपस्थित होताना दिसतो. वस्तुत: व्यवहारातही राजकीय नेते किंवा उच्चपदस्थांच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्ती त्यांची स्तुती करताना दिसतात. 'सर्वे गुणा: कांचन आश्रयन्ति' या न्यायाने ती खोटीही असू शकते कदाचित, पण तरीही आपापल्या हेतुपूर्तीसाठी ती चालू असते.

अध्यात्मशास्त्रातील स्तुतीसुद्धा स्तुतीच असते, परंतु ती निर्गुण तत्त्वाची स्तुती असते. तिथे प्रत्यक्ष कोणी व्यक्ती असतेच असे नाही किंवा असलीच तर त्या व्यक्तीच्या सगुण देहावर त्यातील निर्गुण तत्त्वाच्या सामर्थ्याचा अभ्यास केलेला असतो. व्यावहारिक जगातल्या स्तुतीने क्षुद्र स्वार्थ प्राप्त होत असतीलही कदाचित, परंतु अध्यात्मातील स्तुती कोणाला तरी प्रसन्न करून घेण्यासाठी नसते. त्या स्तुतीने कोणीही प्रसन्न होत नाही. कारण मूळ ब्रह्मतत्त्व, ईश्वरी तत्त्व अथवा सद्गुरू तत्त्व हे निर्गुण निराकार आहे. आपण केलेली स्तुती या निर्गुण तत्त्वाला आवडली आणि प्रसन्न होऊन त्याने वरदान दिलं असं काही होत नसतं. जे निर्गुण आहे, निराकार आहे, त्याला कोणतेही गुण, कोणत्याही भावना बाधित करू शकत नाहीत, तर ते प्रसन्न तरी कसं काय होणार?

असं जरी असलं तरी अध्यात्मशास्त्रात स्तुतीचे प्रयोजन महत्त्वाचे आहे. स्तुतीचा प्रथम सुपरिणाम म्हणजे संकल्पपूर्वक आणि एकाग्रतेने स्तवन पठण करीत राहिल्याने देवतेच्या ज्या गुणांचे वर्णन आपण करतो, ते गुण आपल्यातही संचरित व्हायला सुरुवात होते. महाबली हनुमंताच्या प्रतीकावर एकाग्रता करून 'मनोजवं मारुततुल्य वेगं, जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्' म्हणताना त्याच्या इंद्रिय विजयाचे, बुद्धी तेजाचे, वायुवेगाने धावणाऱ्या मनावर नियंत्रण ठेवण्याचे सामर्थ्य आपल्यात प्रकट व्हावे अशी भावना ठेवली तर काही काळानंतर का होईना, पण असे सामर्थ्य निश्चितपणे निर्माण होत असते. ही आपोआप घडणारी प्रक्रिया असते. त्याला अट फक्त एकच, त्या स्तुतीशी पूर्णत्वाने एकरूप होता आलं पाहिजे. जसजसे हे एकरूपत्व साधेल तसतसे ते गुण हळूहळू मुंगीच्या पावलांनी का होईना, पण आपल्यात प्रवेश करतात. मात्र आपल्यात आधीपासूनच विराजमान असणाऱ्या निर्गुण तत्त्वाचं संस्करण होऊन तसा मानसिक बदल आपल्यात घडण्यासाठी प्रथम आवश्यक असतो तो पापनाश. आपल्यातील निर्गुण तत्त्वाचे ज्ञान आपल्या मनाला नसले तरी ते अंतर्मनात पूर्णत्वाने रुजलेले असते. जन्मजन्मांतरीच्या काही चुकीच्या घडलेल्या क्रियांमुळे अंतर्मनात जी रुखरुख निर्माण होते तेच पाप होय. जसे ऋणभार सम करण्यासाठी धनभार निर्माण करावा लागतो तसेच मनात निर्माण झालेली ही पापाची जाणीव नष्ट होण्यासाठी सत्कर्मे आवश्यक ठरतात.

प.प. श्रीमद् वासुदेवानन्द सरस्वती (टेंबे) स्वामी महाराजांनी श्रीकृष्णा लहरीवरील आपल्या टीकेत स्तुतीच्या प्रयोजनाचं अधिक विवरण केलं आहे, ज्यात पापनाश हे प्रथम प्रयोजन सांगितलेलं आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे, मानवाच्या आध्यात्मिक प्रगतीत तीन बंधनरूपी अडसर असतात. अविद्या, कामेच्छा आणि कर्म. अविद्या म्हणजे 'स्व'रूपाचे अज्ञान, तर कामेच्छा म्हणजे जीवनातल्या सर्व भौतिक इच्छा, ज्यांच्या सतत सहवासाचासुद्धा मोक्ष अथवा समत्व प्राप्तीसाठी अवरोध होतो. बहुतांश कर्मेदेखील फळांच्या अपेक्षने केली जातात. ईश्वराला केलेला नमस्कारसुद्धा 'अमुक काम होऊ दे' अशी मागणी चिकटवून केलेला असतो. जिथे जिथे कर्माला फळाची अपेक्षा असते, तिथे तिथे बंधन निर्माण होते. ज्ञानाव्यतिरिक्त अन्य उपायांनी ही बंधने नाहीशी होत नाहीत, पापनाशाशिवाय ज्ञान होत नाही व पापनाशासाठी स्तुती आवश्यक आहे, असं त्रैराशिक स्वामी महाराजांनी मांडलं आहे.

पापनाशासाठी सत्कर्मांना जोड आवश्यक ठरते ती स्तुतिपठणाची. स्तुती ही अहंकारशून्यतेशिवाय करता येत नाही आणि अहंकारासहित केलेली स्तुती ही खरी स्तुती असू शकत नाही. कारण जेव्हा मनापासून स्तुती केली जाते, तेव्हा आपण आपल्याकडे लघुत्व घेऊन ज्याची स्तुती करतो त्याला गुरुत्व देतो, पर्यायाने तिथे आपोआप अहंकारशून्यत्व साधतो. पापनाशासाठी हे अहंकारशून्यत्वच अंतिमरीत्या निर्णायक ठरते. म्हणूनच ईशतत्त्वाची उच्चरवाने, मुक्तकंठाने स्तुती करावी. असे करत असताना एखादी देवता प्रसन्न होऊन आपल्याला वरदान देईल ही अपेक्षा ठेवण्यापेक्षा आपल्यातलेच चेतनरूपी ब्रह्मतत्त्व प्रकाशित होणार आहे, प्रसन्न होणार आहे याची जाणीव ठेवणे महत्त्वाचे. अशी जाणीव ज्यावेळी होईल तेव्हा अमर्याद अशी वैश्विक शक्तीच आपल्यावर प्रसन्न झालेली असेल.

- बापट गुरुजी